# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५२८ /२०१८ पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा दिनांक २९/०९/२०१८

## (सुधारीत प्रेस नोट)

## "फिर्यादीचे अंगावर पेट्रोल ओतुन, जाळुन खुन करणाऱ्या आरोपीस आजन्म सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा"

पोलीस ठाणे पवनी अंतर्गत राहणार आरोपी नामे लोकेश आनंदराव बारसागडे वय ३६ वर्ष रा. आंबेडकर चौक पवनी याची आई फिर्यादीचे पानठेल्यात नेहमी खर्रा घेण्यास जात होती. फिर्यादीने आरोपीचे आईला त्यांच्यात अनैतीक संबध असल्याचे गांवात चर्चा असल्याबाबत बोलला होता. यावरुन आरोपीचे आईने आपले पती व मुलास सदर बाबात माहीती दिली होती. आरोपी नामे लोकेश आनंदराव बारसागडे वय ३६ वर्ष रा. आंबेडकर चौक पवनी याने त्याचे आईसोबत अनैतीक संबध असल्याचे चर्चेबाबत मनावर घेवुन दिनांक १५/१०/१२ रोजी आपले प्लेझर हिरोहोंडा एम.एच. ३६/११०८ या गाडीचे डीक्कीमध्ये पेट्रोल डबकी घेवुन येवुन फिर्यादिचे पानठेल्यात जावुन त्यांचे अंगावर डबकीतील पेट्रोल टाकल्याने आगीचा भडका होवुन जळुन फिर्यादीस जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादीचे बयाणावरुन पोलीस ठाणे पवनी येथे अप.क्र. १०८/१२ कलम ३०७ भादवी चा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयांचा तपास **श्री. आर. एस. डेरे, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पवनी** यांनी घटणास्थळ गाठुन तपास सुरु केला. सदर गुन्हयातील मृतक विकास पांडुरंग भोगे वय ४७ वर्ष रा. सोमवारी वार्ड पवनी हा दिनांक २३/१०/१२ रोजी उपचारा दरम्यान सा.रु. भंडारा येथे मरण पावल्याने गुन्हयात कलम ३०२ भादवी ची वाढवुन तपास करण्यात आला आहे. आरोपी **लोकेश आनंदराव बारसागडे वय ३६ वर्ष रा. आंबेडकर चौक पवनी** यास तात्काळ अटक केले व साक्ष पुरावा गोळा केला. आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावा मिळुन आल्याने आरोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोप पत्रास केस क्र. १०८/२०१२ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयांची सुनावणी मा. **अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली, गुन्हयांत सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. प्रमोद भुजाडे सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन एकुण १२ साक्षदार तपासले. त्यामध्ये फिर्यादी मृतक विकास पांडुरंग भोंगे याचे मृत्युपुर्व बयाण कोर्टाने ग्राहय धरुन तसेच इतर सबळ पुरावा

ग्राहय धरुन आरोपीला दोषी ठरवले आहे. आज दिनांक २९/९/२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरुप व गंभिरता लक्षात घेवुन आरोपी नामे **लोकेश आनंदराव बारसागडे वय ३६ वर्ष रा. आंबेडकर चौक पवनी** यांचे विरुध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०२ भादवी मध्ये आजन्म कारावास व ५०००/—रु दंड, दंड न भरल्यास ६ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा, तसेच कलम ४३६ भादवी मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २०००/—रु दंड, दंड न भरल्यास ३ महिणे सश्रम कारावासाची शिक्षा, ठोठावण्यात आली आहे.**

गुन्हयात पोलीस निरीक्षक श्री. चकाटे ठाणेदार पोलीस ठाणे पवनी यांचे मार्गदर्शनात पो. हवा. चंद्रशेखर पटले ब.न. ७७९पो. स्टे. पवनी यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

**नोट :— मुतकचे नांव विकास पांडुरंग भोगे वय ४७ वर्ष**
**रा. सोमवारी वार्ड पवनी**

(जितेद्रं के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क. ९४०३१०९७२०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.